SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004
Phone : EPABX –2609000 Seminar – 2609141
Fax : +91-231-2691533, 2693294 & 2692333 Website : www.unishivaji.ac.in
email : pgseminar@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४
फोन : इपीबीएक्स – 2609000 सेमीनार 2609141
फॅक्स : +91-231-2691533, 2693294 व 2692333 Website : www.unishivaji.ac.in
email : pgseminar@unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited
by NAAC(2021)
With CGPA 3.52

जा क्र.: शिवाजी वि./सेमिनार/318 दि. 18/04/2024

# परिपत्रक

प्रति,
मा. अधिविभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर/
मा. प्राचार्य/संचालक,सर्व संलग्नित महाविद्यालये व
मान्यताप्राप्त शिक्षण संस्था.

विषय :– नवीन बदललेल्या अभ्यासक्रमासंदर्भात शिक्षकांसाठी शिबीर/कार्यशाळा आयोजनाबाबत......

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविणेत येते की, सन 2024–2025 यावर्षासाठी नवीन बदललेल्या अभ्यासक्रमासंदर्भात शिबीर/कार्यशाळा आयोजनाचे प्रस्ताव ऑनलाईन मागविण्यात येत आहेत. प्रस्ताव आपल्या महाविद्यालयाच्या मेलवर पाठविण्यात आलेल्या लिंक वरील google form मध्ये भरण्यात यावी. व त्याची प्रत या कार्यालयाकडे सादर करण्यात यावी. यासाठीची नियमावली व प्रस्तावाचा विहीत नमुना माहितीसाठी विद्यापीठाच्या **www.unishivaji.ac.in → Circular → Affiliation → Seminar Section** या संकेतस्थळावर ठेवण्यात आलेला आहे.

1. एका महाविद्यालयात एका विषयाच्या एका पेपरची कार्यशाळा /शिबीर आयोजनाबाबत प्रस्ताव सादर करण्यात यावा.
2. महाविद्यालयीन कार्यशाळा/शिबीर आयोजन प्रस्तावाची ऑनलाईन पूर्तता करून त्याची प्रत **दि.10 मे, 2024** पर्यत विद्यापीठ कार्यालयात सादर करावी.
3. महाविद्यालयांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव संबंधित समितीच्या बैठकीपुढे विचारार्थ ठेवण्यात येतील. शिबीर/ कार्यशाळा आयोजनासाठी प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रत्येक महाविद्यालयास त्यांचे प्रस्ताव मंजूर किंवा नामंजूर झाल्याचे कार्यालयाकडून कळविणेत येईल.

वरील बाबी विचारात घेऊन महाविद्यालयांनी **दि. 10 मे, 2024** पर्यंत प्रस्ताव विद्यापीठ कार्यालयात सादर करावेत. मुदतीनंतर आलेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही. महाविद्यालयांकडून आलेल्या प्रस्तावांच्या अनुषंगाने महाविद्यालयास त्यांचे प्रस्ताव मंजूर झाल्याचे e-mail द्वारे कळविण्यात येईल. तसेच याबाबत कोणत्याही प्रकारच्या तक्रारींची दखल घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,

Sd/–
सहा.कुलसचिव

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## Proposal For New Changed Syllabus Training / Workshop

1) Faculty : ------------------------------------------
2) Subject : ------------------------------------------
3) Class and Paper No. & : ------------------------------------------
3.1) Course Code : ------------------------------------------
4) Workshop : ------------------------------------------
5) Co-ordinator : ------------------------------------------
6) Duration : ------------------------------------------
7) Dates : ------------------------------------------
8) No. of Resource Persons : ------------------------------------------
9) A list of Resource Persons : ------------------------------------------

------------------------------------------

10) No. of Participants : ------------------------------------------
A) Outstation Participants : ------------------------------------------
B) Local Participants : ------------------------------------------

11) Estimated Expenditure : ------------------------------------------
A) T.A. & D.A. to Resource Persons : ----------------------------------
B) Remuneration to Resource Persons : ----------------------------------
C) Xeroxing and other expense : ----------------------------------
D) Miscellaneous expenses : ----------------------------------

Total Rs.------------------------------

Name & Signature of
Co-ordinator

Signature of Principal / Director
with Stamp

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## मार्गदर्शक नियमावली

### नवीन बदललेल्या अभ्यासक्रमासंदर्भात आयोजित केल्या जाणा—या महाविद्यालयीन शिक्षकांच्या प्रशिक्षण शिबीर संदर्भात मार्गदर्शक सूचना

1. सदर शिबीरासाठी प्रशिक्षणार्थ शिक्षकांकडून नोंदणी फी आकारू नये.
2. शिबीराच्या वेळी संबंधित शिक्षकांना नाष्टा, चहापान व वर्किंग लंच द्यावा. यासाठी कमाल खर्चाची मर्यादा प्रत्येकी रू.125/— राहील. शिबीरास मदत करणा—या महाविद्यालयामधील अधिकच्या जास्तीत जास्त 10 शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांना भोजन खर्च मान्य केला जाईल.
3. प्रशिक्षणासाठी अत्यावश्यक असलेले संदर्भ साहित्य, झेरॉक्स, पेन, फाईल इ. शिक्षकांना उपलब्ध करून द्यावे, त्यासाठी प्रती शिक्षकास रू. 50/— इतका खर्च मान्य राहील.
4. शिबीर कार्यक्रमाच्या वेळी जास्तीत जास्त वेळ हा शिबीरार्थीना मार्गदर्शन करण्यासाठी उपयोगात आणावा. उद्घाटन समारंभासाठी जास्तीत जास्त 30 मिनीटे वेळ देण्यात यावा. तसेच, त्यासाठी रू.500/— एवढाच खर्च मान्य राहील.
5. शिबीरास हजर राहणा—या शिक्षकांना प्रवास खर्च व दैनिक भत्ता देण्यात येऊ नये.
6. बीजभाषकास प्रवास खर्च व रू.500/— इतके मानधन देण्यात यावे.
7. मार्गदर्शक तज्ञांना त्यांचा प्रवास खर्च, विद्यापीठ नियमाप्रमाणे आदा करावा. तसेच प्रत्येक व्याख्यानासाठी रू.300/— प्रमाणे मानधन देणेत यावे.
8. बीजभाषक, तसेच मार्गदर्शक तज्ञांच्या निबंधाच्या झेरॉक्स प्रती देयकांसोबत विद्यापीठाकडे सादर कराव्यात.
9. शिबीरास हजर राहणा—या शिक्षकांची आवश्यक असल्यास राहण्याची व्यवस्था संबंधित आयोजक महाविद्यालयाने विना मोबदला करून द्यावी.
10. सदर प्रशिक्षण शिबीरास हजर राहणा—या शिक्षकांना आयोजक महाविद्यालयाने उपस्थिती प्रमाणपत्र (Attendance Certificate) द्यावे.
11. विद्यापीठ परिसरातील अधिविभागामध्ये आयोजित केल्या जाणा—या शिबीरास उपस्थित राहणा—या शिक्षकांची राहण्याची व्यवस्था विद्यापीठाने करावी.
12. सदर शिबीरास उपस्थित राहणा—या शिक्षकास कार्यरत रजा संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी मंजूर करावी.
13. विद्यापीठाने मंजूर केलेल्या रक्कमेच्या 80% रक्कम तसलमात म्हणून संबंधित महाविद्यालयास पाठविण्यात यावी.
14. शिबीर समाप्तीनंतर 05 दिवसांच्या आत संबंधित संयोजकांनी (प्राचार्यांनी/ पदव्युत्तर विभागप्रमुखांनी) शिबीराच्या खर्चाचा संपूर्ण हिशोब व मूळ बीले महाविद्यालयाने आपल्याकडे ठेवावीत आणि फक्त विहित नमुन्यामधील चार्टर्ड अकौंन्टट यांनी प्रमाणित केलेले उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) विद्यापीठ कार्यालयास पाठवून द्यावे. (तथापि शिबीर खर्चाचा संपूर्ण हिशोब व मूळ बील विद्यापीठ कार्यालयाच्या मागणीनुसार उपलब्ध करून देणे आयोजक महाविद्यालयास बंधनकारक राहील.) तसेच उपयोगिता प्रमाणपत्रासोबत शिबीराचा सविस्तर अहवाल, शिबीरास उपस्थित असणा—या शिबीरार्थीच्या नावाची यादी इ. कागदपत्रे विद्यापीठास सादर करावीत.

---